लोकसत्ता

# कोल्हापुरात चित्र-शिल्प प्रदर्शनाला प्रारंभ

लोकसत्ता प्रतिनिधी

कोल्हापूर : विज्ञानात जनुकीय बदल शक्य आहेत, परंतु अभिजात कलेचे मूल्य कधीही बदलणार नाहीत. व्यक्तीच्या आयुष्यातून कलेचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी रविवारी केले.

राजर्षी शाहू स्मारक भवन येथील कलादालनात रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार



पुरस्कार जे. जे. स्कूलची विद्यार्थिनी चित्रकार प्रतीक्षा व्हनबट्टे यांना प्रदान करण्यात आला. दळवीज आर्ट इन्स्टिट्यूट, जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये चित्रकलेचे धडे गिरवलेल्या प्रतीक्षा यांची देशभरातील मानाच्या प्रदर्शन आणि कार्यशाळेमध्ये निवड झाली आहे. अध्यस्थानी ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे होते. के. आर. कुंभार यांचे नातू शुभम यावेळी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, ज्येष्ठ चित्रकार डॉ. मानसिंग टाकळे, प्राचार्य अजेय दळवी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. शिंदे यांच्या हस्ते यावेळी प्रफुल्ला डहाणूकर पुरस्कार विजेते विजय उपाध्ये, राम मेस्त्री तसेच मेरिट पुरस्कार विजेते विजय टिपुगडे यांचा सत्कार करण्यात आला. मनोज दरेकर यांनी सूत्रसंचालन केले. नागेश हंकारे यांनी आभार मानले. अजेय दळवी यांनी परिचय करून दिला. हे प्रदर्शन १८ मार्चपर्यंत खुले राहणार आहे.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामार्फत महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे दि.१३ ते २३ मार्च या कालावधीत क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे आयोजन करण्यात आले. उद्‌घाटन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत सोमवारी सकाळी ८.३० वाजता होणार आहे. स्पर्धेसाठी मुख्य अतिथी म्हणून माजी रणजीपटू अतुल गायकवाड उपस्थित राहणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ, अहिल्यादेवी विद्यापीठ सोलापूर, बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी; मुंबई विद्यापीठ; महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक; महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ, नागपूर; डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे; यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे संघ सहभागी होणार आहेत.

13 MAR 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यक्तीच्या आयुष्यातून कलेचे महत्त्व कमी होणार नाही : डॉ. व्ही. एन. शिंदे

## चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन : प्रतीक्षा व्हनबट्टे उपक्रमशील युवा पुरस्काराने सन्मानित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विज्ञानात जनुकीय बदल शक्य आहेत; परंतु अभिजात कलेचे मूल्य कधीही बदलणार नाही. व्यक्तीच्या आयुष्यातून कलेचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवन येथील कलादालनात रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्घाटन रविवारी डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या सोहळ्यात त्यांच्या हस्ते के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्कार जे. जे. स्कूलची विद्यार्थिनी चित्रकार प्रतीक्षा व्हनबट्टे यांना प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे होते.

डॉ. शिंदे म्हणाले, चित्रकलेतील गुरू-शिष्यांची परंपरा कोल्हापुरी स्कूलने जपलेली आहे. शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर म्हणाले, कलेशिवाय जगणे नाही. कलाकृती पाहून आनंद होत नाही, अशी एकही व्यक्ती नाही. ज्येष्ठ चित्रकार डॉ. मानसिंग टाकळे म्हणाले, प्रत्येकाकडे स्वतःची अभिव्यक्ती असते. आज स्वतःची ओळख निर्माण करण्याच्या नादात आपल्या गुरूची ओळख पुसली जाते, याचे भान ठेवले जात नाही.

प्राचार्य अजेय दळवी म्हणाले, आबालाल रहेमानपासून टी. के. वडणगेकर यांच्यासह अनेक कलाकारांनी पूर्वीपासूनच कोल्हापूरचे नाव उज्ज्वल केले आहे. कोल्हापुरी स्कूलची हीच परंपरा आताच्या पिढीतील कलाकार ललित आणि चित्रकलेच्या माध्यमातून जगभर पोहोचत आहेत. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते यावेळी प्रफुल्ला डहाणूकर पुरस्कार मिळविणाऱ्या कोल्हापूरच्या विजय उपाध्ये, राम मेस्त्री तसेच मेरिट पुरस्कार मिळविणारे विजय टिपुगडे यांचाही सत्कार करण्यात आला. या प्रदर्शनात विजय टिपुगडे, प्रतीक्षा व्हनबट्टे, इंद्रजित बंदसोडे, बबन माने, गजेंद्र वाघमारे, आरिफ तांबोळी, संतोष पोवार, किशोर राठोड, नागेश हंकारे, शैलेश राऊत आदींच्या कलाकृती मांडल्या आहेत. हे प्रदर्शन १८ मार्चपर्यंत सकाळी १०.३० ते रात्री ८.३० या कालावधीत खुले राहणार आहे. यावेळी ज्येष्ठ चित्रकार शिवाजी म्हस्के, आर्किटेक्ट मोहन वायचळ, इंद्रजित बंदसोडे, प्रकाश पुरोहित उपस्थित होते.

पुण्यनगरी

# यशवंतराव चव्हाण जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, पहिले मुख्यमंत्री व देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांची जयंती शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. भारती पाटील, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी, डॉ. संतोष सुतार, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. उमेश गडेकर, डॉ. कविता वड्राळे, डॉ. वैशाली भोसले, डॉ. तानाजी घागरे, चेतन गळगे, गजानन साळुंखे, परशुराम वडार आदी उपस्थित होते.

13 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभिजात कलेचे महत्त्व कमी होणार नाही

## डॉ. व्ही. एन. शिंदे : गुरू-शिष्य चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. १२ : विज्ञानात जनुकीय बदल शक्य आहेत. परंतु, अभिजात कलेचे मूल्य कधीही बदलणार नाहीत. व्यक्तीच्या आयुष्यातून कलेचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. राजर्षी शाहू स्मारक भवन येथील कलादालनात रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित चित्र-शिल्प प्रदर्शनाचे उद्‌घाटन रविवारी डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या सोहळ्यात त्यांच्या हस्ते के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्कार जे. जे. स्कूलची विद्यार्थिनी चित्रकार प्रतीक्षा व्हनबट्टे यांना प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ चित्रकार विलास बकरे होते.



कोल्हापूर : रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित चित्र-शिल्प प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी के. आर. कुंभार उपक्रमशील पुरस्कार प्रतीक्षा व्हनबट्टे यांना प्रदान करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. शेजारी इतर मान्यवर.

विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर म्हणाले, 'कोल्हापूरी स्कूलने एका चौकटीत बंदिस्त झालेली चित्रकला बहुजनांसाठी खुली केली, हा गुरू-शिष्य परंपरेचा शाहू विचार आजही सुरू आहे.'

ज्येष्ठ चित्रकार डॉ. मानसिंग टाकळे म्हणाले, 'प्रत्येकाकडे स्वतःची अभिव्यक्ती असते. आज स्वतःची ओळख निर्माण करण्याच्या नादात आपल्या गुरुची ओळख पुसली जाते, याचे भान ठेवले जात नाही. परंतु, गुरु हीच त्याची ओळख असते. ही परंपरा पुढे नेण्यासाठी वाटचाल करावी लागेल.'

प्राचार्य अजेय दळवी यांनी कोल्हापुरी स्कूलची परंपरा उलगडली. यावेळी प्रफुल्ला डहाणूकर पुरस्कार मिळविणाऱ्या उपाध्ये, राम मेस्त्री तसेच मेरिट पुरस्कार मिळविणारे विजय टिपुगडे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी के. आर. कुंभार यांचे नातू शुभम, ज्येष्ठ चित्रकार शिवाजी म्हस्के, आर्किटेक्ट मोहन वायचळ, इंद्रजित बंदसोडे, प्रकाश पुरोहित उपस्थित होते. मनोज दरेकर यांनी सूत्रसंचालन केले. नागेश हंकारे यांनी आभार मानले.

प्रदर्शनात विजय टिपुगडे, प्रतीक्षा व्हनबट्टे, इंद्रजित बंदसोडे, बबन माने, गजेंद्र वाघमारे, आरिफ तांबोळी, संतोष पोवार, किशोर राठोड, नागेश हंकारे, शैलेश राऊत, पूनम राऊत, मनोज दरेकर, अभिजित कांबळे, मनीपद्म हर्षवर्धन, प्रवीण वाघमारे, विजय उपाध्ये, राहुल रेपे, विलास बकरे, शिवाजी मस्के, चेतन चौगुले आदींच्या कलाकृती मांडल्या आहेत. हे प्रदर्शन शनिवार (ता. १८) पर्यंत सकाळी साडेदहा ते रात्री साडेआठ या कालावधीत खुले राहणार आहे.

सकाळ

# 'कुलगुरू चषक क्रिकेट' स्पर्धा आजपासून

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा उद्या, सोमवार ते २३ मार्चदरम्यान होणार आहे. त्यामध्ये विविध १२ विद्यापीठांच्या संघांनी नोंदणी केली आहे.

विद्यापीठातील क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलात सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, माजी रणजीपटू अतुल गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ (सोलापूर), कवीयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशिक), महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ (नागपूर), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (लोणेरे) आदी संघ सहभागी झाले आहेत.

## तीन वर्षांनी शिवाजी विद्यापीठाला संधी

- विद्यापीठांमधील कर्मचाऱ्यांच्या क्रीडा गुणांना संधी देण्यासाठी या स्पर्धा दरवर्षी राज्यातील विविध विद्यापीठांमार्फत आयोजित केल्या जातात. कोरोनामुळे दोन वर्षे स्पर्धा झाली नाही. यापूर्वी शिवाजी विद्यापीठात २०१६ मध्ये राज्यस्तरीय, तर सन २०१९ मध्ये अखिल भारतीय विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा झाली होती.

सकाळ

# यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

कोल्हापूर : विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. भारती पाटील, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी, संतोष सुतार, अमोल मिणचेकर, उमेश गडेकर, कविता वड्राळे, वैशाली भोसले, तानाजी घागरे, चेतन गळगे, गजानन साळुंखे, परशुराम वडार, आदी उपस्थित होते.

13 MAR 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० आजपासून

## सकाळी ८.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा आज (दि. १३)पासून सुरू होत आहे. सकाळी ८.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठातील क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी रणजीपटू अतुल गायकवाड (अधीक्षक, सीमाशुल्क आणि केंद्रीय जी. एस. टी. विभाग, पुणे) उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने प्रसिध्द केली आहे.

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत राज्यातील ११ विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, नाशिकचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जळगावचे कवियत्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, नागपूर येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ या विद्यापीठांच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला आहे. प्रमुख पाहुणे अतुल गायकवाड यांची नुकतीच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महाराष्ट्र १९ वर्षाखालील क्रिकेट संघाच्या व्यवस्थापकपदी नियुक्ती झाली आहे.